# दि. २२.०६.२०१७
## रामेती, पुणे येथील प्रशिक्षणांचा आढावा

१. **“उन्नत शेती - समृध्द शेतकरी” :-**

प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, रामेती, पुणे व महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५.०५.२०१७ ते २५.०५.२०१७ या कालावधी मध्ये ïîउन्नत शेती - समृध्द शेतकरीò अभियानांतर्गत प्रशिक्षकांचे प्रशिक्षण संपन्न झाले. सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण काळात ७ महिला व २२० पुरुष प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. या प्रशिक्षण वर्गात खरीप हंगामातील पुणे विभागातील महत्वाची पीके उस, कापूस, बाजरी, मका, सोयाबीन, भुईमूग, तूर, उडीद, मुग, नाचणी यावरील उत्पादन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले.










**प्रशिक्षण काळातील क्षणचित्रे**

## २. राज्य प्रशिक्षण धोरण :-

प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, रामेती , पुणे येथे सन २०१७-१८ मध्ये दि. ०९.०६.२०१७ पर्यंत राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत ४ प्रशिक्षणे आयोजीत केली असून ती पार पाडण्यात आली आहेत. सदर प्रशिक्षणास कृषि विभाग, वन विभाग व लेखा व कोषागारे या विभागातील वर्ग- ३ चे कर्मचारी यांचा सहभाग आहे. त्यांना प्रशासकीय पायाभूत प्रशिक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षणास सत्र- १ ४ महिला व १८ पुरुष प्रशिक्षणार्थी, सत्र- २ ६ महिला व १७ पुरुष प्रशिक्षणार्थी, सत्र- ३ ९ महिला व २१ पुरुष प्रशिक्षणार्थी तर सत्र- ४ १४ महिला व ९ पुरुष प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.










**प्रशिक्षण काळातील क्षणचित्रे**